(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# डॉ.बाबासाहेब आणि स्त्रियांचे सक्षमीकरणाची चळवळी

प्रा.डॉ.एस.के.खडसे

राज्यशास्त्र विभागप्रमुख कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर जि.सांगली (महाराष्ट्र)

.............................................................................................................................

**प्रस्तावना :—**

भारताच्या समाज व्यवस्थेचा हा विषमतेचा आहे. त्यामुळे प्राचीन काळापासुन भारतीय हिंद ूसंस्कृतीमध्ये चातुर्वण्य व्यवस्था निर्माण करून मानवी जीवनात विषमता निर्माण करण्याचे कार्य येथील ब्राम्हणी व्यवस्थेने केले आहे. यामध्ये ब्राम्हण,क्षेत्रीय,वैश्य आणि शुद्र या चारही वर्णामध्ये हजारो जाती, पोटजाती, उपजाती निर्माण केल्या. त्यामुळे प्रत्येक जातीचे काम, रोटी व्यवहार व बेटी व्यवहार सुध्दा होणार नाहीत. यांचीही या ब्राम्हणी व्यवस्थेने काळजी घेवून चार वर्णामध्ये सर्वात हुशार बुध्दीमान म्हणून ब्राम्हण आणि धर्माची संपूर्ण सत्ता व धर्माच्या नितीनियमाचा अर्थ लावण्याचे, देव देवताचे, विधी व अध्यात्मिक सत्तेचे संपूर्ण अधिकार आपल्याकडेच ठेवले आणि भारतामध्ये तंत्र मंत्र, यज्ञ, कर्मकांड या गोष्टीचा उदय झाला. या तंत्रमंत्र यज्ञ व कर्मकांडामुळे मानवी जीवनाचे शोषण होवू लागले. धर्माच्या, जातीच्या प्रथापरंपरेच्या नावाखाली कोणाचोही शोषण होवु नये, त्यांचे अधिकार व स्वातंत्र्य हिरावून घेवु नये यासाठी प्राचीन काळापासून या जगात अनेक क्रांत्या झाल्या. ज्यांच्यावर अन्य होता, ज्यांचे शोषण होते ते प्रतिकार करण्यासाठी क्रांती व चळवळी करतात तर या क्रांतीला विरोध करण्यासाठी प्रतिक्रांती सनातनी व प्रतिगामी लोक प्रतिक्रांती करीत असतात.

भारतामध्ये अनेक महापुरूषांनी या कर्मकांड, धर्मवर्चस्वाला विरोध व मानवाचे शोषण थांबविण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावले. यांमध्ये गौतमबुध्द, महावीर, चार्वाक, सम्राट अशोक, संत कबीर, गुरूनानक, राजाराम मोहन राय, छत्रपती शिवाजी महाराज, म.फुले, राजर्षी शाहु महाराज, महर्षी कर्वे, प्रबोधनकारक ठाकरे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, म.गांधी, रामास्वामी पेरीयार, संत रोहिदास, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इत्यांदीनी हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथापरंपरा, कर्मकांड जाती व्यवस्था, धर्माधता व मानवी शोषण नष्ट करण्यासाठी चळवळी केल्या. जे आजही भारतातील सामाजिक चळवळीच्या व स्त्री चळवळीच्या इतिहासात अजरामर आहेत.[१]

**Key words :-**

१) प्रस्थापित जाती, २) उच्चवर्णीय, ३) दलित, ४) शुद्र, ५) सत्याग्रह, ६) सक्षमीकरण

२) प्रस्थापित जाती : समाजातील आर्थिक सामाजिक क्षेत्राखालील प्रभावी वर्चस्ववादी जाती.

३) उच्च वर्णीय : चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील ब्राम्हण क्षेत्रीय, वेश्य.

४) दलित : घटनात्मक दृष्टीने अनुसूचित जाती किंवा पारंपारिक अस्पृश्य समाज.

५) सत्याग्रह : हा सरकार विरूध्द आंदोलनाचा एक मार्ग.

६) सक्षमीकरण: समाजातील दुर्लक्षीत, अविकसीत स्त्रीयांना विविध क्षेत्रात प्रगतीशील बनविण्यासाठी एक योजना.

**स्त्री चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभुमी :—**

भारमाध्ये प्राचीन काळात मातृसत्ताक पध्दत अस्तित्वात होती. आजही अनेक आदीवासी जमातीमध्ये मातृसत्ताकपध्दत अस्तित्वात असलेली दिसुन येते.परंतू मनुस्मृतीने शुद्रावर विशेषता महिलांवर अनेक प्रकारचे बंधने लादली आणि पुरूषांपेक्षा स्त्री अबला आहे, कनिष्ठ आहे हे स्पष्ट करून स्त्री चुल आणि मुल यापुरती मर्यादीत ठेवण्याचे कार्ये व स्त्रीयांचे सर्व अधिकार काढून घेवून तिचा सर्वांगीन विकास खुंटविण्याचे कार्यही मनुस्मृतीने केले. आणि स्त्री—पुरूष विषमता निर्माण झाली. गौतमबुध्दाने अडीच हजार वर्षापूर्वी स्त्रीयांना पुरूषाच्या बरोबरीत धम्मप्रचारामध्ये सहभागी करून स्त्री—पुरूष समता निर्माण करण्याचा प्रत्यक्षात प्रयत्न केला.[२] परंतु ब्राम्हणी व्यवस्थेने समाज व्यवस्थेत स्त्रीयांचे दुय्यम स्थान ठेवले, या सर्व स्त्रीया

रूढी परंपरेच्या व पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये पुरूषांच्या वर्चस्वाखाली घरामध्ये दासीचे जीवन जगत होत्या. मनुस्मृतीमध्ये न स्त्री स्वातंत्र्यमर्हते असे सांगुन स्त्रीने बालपणात वडीलांच्या आधाराने, तरूणपणी नव—याच्या आधाराने आणि म्हातारपणी मुलांच्या आधाराने जगावे म्हणजे त्यांना कधीच स्वातंत्र्य दिले जाणार नाही अशी तरतुद केली होती. त्यामुळे सर्वच धर्म ग्रंथामध्ये स्त्रीयांना स्थान गौण होते.

इस्लाम धर्माच्या कुराण या धर्म ग्रंथांत स्त्रीया विषयी लिहीलेले आहे की पुरूष स्त्रीयांपेक्षा श्रेष्ठ बनविले आहे. पुरूष आपली संपत्ती खर्च करून स्त्रीयांचे पालन पोषण करतात, ज्या स्त्रीया पुरूषासोबत उध्दटपणे वागतील त्यांना कठोर शिक्षा द्या मात्र त्या सुधारल्यानंतर त्यांना शिक्षा माफ करावी.

ख्रिश्चन धर्मग्रंथ बायबल या पवित्र धर्मग्रथांत स्त्रीयांविषयी असे म्हटले आहे की स्त्रीयांनो प्रभू ईश्वराप्रमाणेच स्वत:च्या पतीलाही शरण जा. पुढे असेही म्हटले की चर्चचा प्रमुख ख्रिस्त त्याप्रमाणे पत्नीसाठी तिचा नवरा वरीष्ठ, तोच तिचा रक्षणकर्ता आहे. चर्चवर ख्रिस्ताची सत्ता चालते त्याचप्रमाणे स्त्रीयांनी प्रत्येक गोष्टीमध्ये नव—याची सत्ता मान्य करावी. जगातील जवळ जवळ सर्व धर्मग्रंथामध्ये स्त्रीयांना दुय्यम माणूस पुरूषांना स्त्रीयांवर सत्ता गाजविण्याचे अधिकाराप्रदान केला आहे.[३]

**सामाजिक चळवळीत स्त्रीयांचा सहभाग :—**

भारतामध्ये ज्या चळवळी झाल्या, जे विद्रोही संप्रदाय निर्माण झाले या सर्वच चळवळीमध्ये स्त्रीया सहभागी झालेल्या होत्या. स्वातंत्र्यासाठी असो किंवा न्याय अधिकारांची मागणीसाठी चळवळ असो यामध्ये स्त्रीयाचा सक्रिय सहभाग म्हणजे त्यांच्या मानवी हक्कांची मागणीच. मात्र इतिहासकारानी व चळवळीवर वर्चस्व असणा—या पुरूषानी स्त्रीयांना जाणीवपूर्वक डावलेले आहे. त्यांच्या सहभागाची नोंद कधीही आवर्जुन केलेली नाही. संतवाङ:मय परंपरेत व अध्यात्म परंपरेच्या संत जनाबाई मुक्ताबाई पासुन ते सोयराबाईपर्यंत सर्वच महिलांकडे संत पुरूष संतानी दुर्लक्ष केलेले.[४]

म.गांधीच्या राजकीय स्वातंत्र्य चळवळीत लक्षणीय स्त्रीया सहभागी झाल्या. भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजेत हा विचार डोळयासमोर ठेवून स्वातंत्र्य चळवळीत हजारोच्या संख्येने स्त्रीया सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये सर्व जाती, धर्माच्या स्त्रीया होत्या. म.गांधी सुध्दा स्त्रीयांना एका विशीष्ट मर्यादिपर्यंत स्त्रियांना स्वातंत्र्य असले पाहिजेत या पारंपारीक विचाराचे होते. त्यामुळे म.गांधीनी स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात महिलांकडे दुर्लक्ष करून फारसे स्थान दिले नाही. मात्र महिलांनी असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग मिठाचा दांडी सत्यागृह व चलेजाव, भारतछोडो आंदोलनात महिलांनी हजारोच्या संख्येने सक्रिय सहभाग घेतला. मात्र पुरूषी इतिहासकारांनी सर्व महिलांची नोंद घेतलीच नाही नाममात्र प्रस्तापित जातीच्या महिलांची नावे नोंद केली मात्र हजारोच्या संख्येने गरीब कामगार दलित आदीवासी मुस्लीम महिलांच्या सहभागाच्या इतिहासाकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे.

**फुले आंबेडकरी चळवळीत महिलांच्या सहभाग :—**

म.फुले व सावित्रीबाई फुले यांना स्त्रीयाच्या अधिकारांची जाणीव होती. म.फुले यांनी स्त्री सुधारणेसाठी त्यांना शिक्षण मिळाले पाहिजेत म्हणजे त्यांना त्यांच्या अस्तित्वाची, त्यांच्या हक्क व स्वातंत्र्याची जाणीव होईल म्हणून त्यांनी पुण्याला १९४८ मध्ये महिलांसाठी पहिली शाळा सुरू केली आणि सावित्रीबाईंना शिकवून तेथे शिक्षीका म्हणून काम पाहिले.[५]

म.फुले स्त्रीपुरूष समतेचे समर्थन करणारे असुन त्यांना स्त्री पुरूषापेक्षा श्रेष्ठ आहे हे माहित होते. मनुवादी परंपरेने सर्व स्त्री व शुद्रास सारखेच मानले होते. त्यामुळे सर्व धर्माच्या जातीच्या स्त्रीयांना शिक्षणापासुन वंचीत केले होते. अज्ञान व अंधकारात पिचत ठेवलेले होते. त्या सर्व जाती धर्माच्या स्त्रीयांना शिक्षण देवून त्याचा उध्दार करण्यासाठी म.फुले यांनी जीवाचे रान करून कार्ये केले. हि म.फुलेंची चळवळ म्हणजे आंबेडकरी स्त्री चळवळीची दिशा आहे तोच धागा पकडुन पुढे शाहु महाराजांनी व नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री सुधारनेसाठी

व स्त्री मुक्तीसाठी लढा चालुच ठेवला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जनता, मुकनायक व बहिस्कृत भारत या पाक्षिकात महिलामध्ये जनजागृती करण्यासाठी व त्यांच्या सर्व प्रकारच्या हक्क व स्वातंत्र्याची व न्यायाची जाणीव करून देत असत. चवदार तळे सत्यागृहाच्या वेळी मनुस्मृती दहन करताना स्त्रीयांवर मनुस्मृतीने कशाप्रकारचे अन्याय अत्याचार केले याची सविस्तर मांडणी केलेली होती.

दलित महिलाच्या समस्या, दु:ख वेदना प्रश्न, इतर उच्च व मध्यम वर्गीय व जातीय महिलापेक्षा नकीच जास्तच आहेत. मात्र आजही महिला म्हणून फायदे मात्र उच्च जातीय महिला घेत आहेत मात्र हा विषय वेगळा आहे. प्रत्यक्षात या देशामध्ये लोकसंख्येच्या जवळपास निम्या महिला आहेत मात्र असे असूनही महिलांना राजकारणात समाजकरणात वा अर्थकारणात फारशे स्थान पुरूष प्रधान संस्कृतीने दिलेले नाही. मात्र आज भारतातील सर्व स्त्रीयांना भारतीय राज्यघटनेच्या रूपाने पुरूषाप्रमाणेच मानसन्मानाने जगण्याची व आपली सर्वांगीन प्रगती करण्याची संधी भारतात सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीच दिली.[८]

डॉ.बाबासाहेब आपल्या पत्नीला पत्रात लिहितात मी स्त्री मुक्तीसाठी लढणारा एक लढवय्या शिपाई आहे. स्त्रीयांच्या उन्नतीसाठी मला जे जे करता येईल ते ते मी अवश्य करीन.प्रसंगी विरोध पत्करावा लागला तरी मी माघार घेणार नाही. माझ्या देवदासी भगिनींच्या उत्थानासाठी मला खुप काही करावयाचे आहे असा स्त्री मुक्तीचा सतत ध्यास घेणारे स्त्रीमुक्तीच्या आंदोलनाचे पहिले प्रणेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. १९४२ मध्ये नागपूर येथे अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे अधिवेशन झाले तेव्हा पंचवीस हजार महिला सहभागी झाल्या होत्या. हया सर्व दलित महिला खेडयापाडयातून चालत चालत आल्या होत्या. त्यापुढे बाबासाहेब आंबेडकराच्या सत्याग्रहामध्ये सक्रिय सहभागी झाल्या होत्या. त्यांनी आपल्यामध्ये बदल करून शिक्षण आपल्या मुलांना शिक्षण दिले. महाड चवदार तळे सत्याग्रहामध्ये शेकडो महिला खेडया पाडयातून आल्या होत्या. त्यांनी या बाबासाहेबांच्या चळवळीला फार मोठा हातभार लावला यावेळी त्यांनी दलित समाजात कुटूंबनियोजनाचा प्रचार प्रसार करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

**हिंदू कोड बील आणि स्त्री सक्षमीकरण :**

भारतीय समाजात स्त्री पुरूष समतेवर जेव्हा म.फुले व इतर समाजसुधारकांनी भर दिला त्यापेक्षाही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री मुक्ती व स्त्रीयांना समाज हक्क मिळाले पाहिजेत यासंदर्भात हिंदू कोड बीलाच्या माध्यमातून भर दिला.

भारतातील कर्मकांड, अंधश्रध्दा, अनिष्ठ प्रथा परंपरा दुर करण्यासाठी स्त्री पुढाकार घेऊ शकते व ही व्यवस्था परिवर्तनही स्त्रीच करू शकते यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर ठाम होते. त्यामुळेच पुरूषाप्रमाणेच प्रत्येक क्षेत्रात स्त्रीला समान स्थान व समान दर्जा, हक्क, स्वातंत्र्य, मालमत्तेचा हक्क, सामाजिक, आर्थिक व न्याय मिळाला पाहिजेत यासाठी त्यांनी घटनात्मक तरतुदी केल्या. त्यांनी केलेल्या घटनात्मक तरतुदी केवळ दलित स्त्रीयांसाठीच नव्हत्या तर या भारतातील सर्व जाती धर्माच्या स्त्रीयांसाठी केल्या होत्या. त्यामुळेच आज महिलांना पित्याच्या मालमत्तेत हक्क, पोटगी हक्क, आपल्या मर्जीप्रमाणे लग्न, घटस्फोट, नोकरी पुनर्विवाहाचा अधिकार, समान काम समान वेतनाचा, हक्क शिक्षणाचा, व्यवसाय करण्याचा हक्क, संघटना स्थापन करण्याचा हक्क, धर्म स्वातंत्र्याचा, आपले मत व्यक्त करण्याचा, शोषणाविरूध्द हक्क व स्वातंत्र्य बहाल केले असुन राज्याने त्यांना सरंक्षण व सोयीसुविधा द्याव्यात अशीही तरतुद डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी केली.[१०]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्यांमध्ये आद्य प्रणेते गौतम बुध्द स्त्री सुधारणावादी म.फुले, बडोद्याचे समाज सुधारणावादी, समतावादी महाराज सयाजीराव गायकवाड, कोल्हापूर संस्थानात सामाजिक समता व न्यायाचे प्रत्यक्ष कायदे करणारे राजर्षी शाहु महाराज व संत कबीर यांना गुरू मानुन मानवी शोषण मुक्तीची, स्त्री मुक्तीची व स्त्री उध्दाराची चळवळ गतीमान केली आणि घटनेच्या चौकटीत स्त्रीयांच्या विकासासाठी व त्यांची गुलामगीरी नष्ट

करण्यासाठी त्यांना हक्क व स्वातंत्र्य भारताच्या इतिहासात पहिल्यांदा केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे जे सत्याग्रह, आंदोलने चळवळी केल्या मग चवदार तळे सत्याग्रह असो, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, विविध मेळावे परिषदा, पुण्यातील पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह, बंगालमधील कालीचा मंदिर प्रवेश, नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह असो किंवा येवले येथील धर्मांतर घोषणा कार्यक्रम व नागपूर येथे बौध्द धर्मांतराचा कार्यक्रम असो या सर्व सत्याग्रह व आंदोलनात हजारोच्या संख्येने महिला पुरूषाच्या बरोबरीने सक्रिय सहभागी झालेल्या होत्या हे भारतीय स्त्रीयांच्या उन्नतीच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे.

**निष्कर्ष:—**

डॉ.बाबासाहेब आंबेकरांचे स्त्री सक्षमीकरणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वी काही आगरकर, महर्षी कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, म.गांधी यांनी काही अंशी प्रयत्न केले. परंतु त्यांच्या स्त्री सक्षमीकरणाला खुप मर्यादा होत्या कारण ते उच्च जातीतील असल्यामुळे त्यांना फारसे चटके बसलेले नव्हते. बाबासाहेबांनी मात्र जे स्त्रीयांसाठी कार्य केले ते भारतातील सर्व जातीधर्मातील महिलांसाठी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्था, चातुवर्ण व्यवस्थाचा शुद्र, अतिशुद्र आणि महिला यांचा अतिशय विस्तृत व वेगवेगळया अंगानी अभ्यास केला होता. विशेषतः चातुवर्ण पध्दतीतही स्त्री शोषीतच होती चारही वर्णात स्त्रीयांवर खुप मोठया प्रमाणात बंधने लादलेली होती. त्यांच्यावर अन्याय अत्याचार होत होते. तसे इतर धर्मातील स्त्रीयांवरही अनेक बंधने होते. त्यामुळे त्यांच्या विकासाचे मार्ग घटनात्मक मार्गाने खुले करण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले व त्यांना घटनात्मक तरतुदी करून त्यांच्या विकासासाठी हक्क व स्वातंत्र्याचे व न्यायाचे मार्ग कायद्याने खुले केले. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाच्या इतिहासात व चळवळीत डॉ.बाबासाहेबाचे योगदान सर्वात जास्त आहे. या घटनात्मक तरतुदीनुसार वेगवेगळे कायदे करून त्यांना सर्व क्षेत्रे खुले झालेली दिसून येतात आज सर्वच क्षेत्रात स्त्रीया पुढे आहेत. हे डॉ.बाबासाहेबाच्या स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीमुळेच

**संदर्भ :—**

१) डॉ.खडसे सुनिता, प्रा.खडसे संतोष, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम प्रकाशन पुणे.
२) हातेकर अर्चना, समाज परिवर्तन चळवळीत महिलांचा सहभाग व भुमिका, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, नागपूर.
३) उपरोक्त.
४) मुन मिनाक्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित स्त्री मुक्ती चळवळ, आम्ही मैतरणी, त्र्यमासिक, मुंबई .
५) डॉ. महाजन वंदना, मोर्चा चळवळी आणि ती, महाराष्ट्र टाईम्स, २०१७
६) डॉ.ऑम्व्हेट गेल, ज्योतिबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार.
७) डॉ.बी.आर. आंबेडकर बहिस्कृत, भारत. १५ जुलै १९२७
८) वाघधरे तक्षशिला, आंबेडकरी स्त्री चळवळ समस्या व संघर्ष, आम्ही मैतरणी विशेषांक मुंबई.
९) डॉ.लाजेवाद ज्योती, डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे स्त्री विषयक विचार, आम्ही मैतरनी फुले आंबेडकर स्त्री विशेषांक. १९९२
१०) सुनिता खडसे, प्रा.संतोष खडसे, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रीया, शुभम प्रकाशन पुणे.